<u>सत्र प्रकरण क्रमांक १३४/२०२३</u>
<u>शासन वि. शेख अन्सार</u>
<u>निशाणी क्रमांक २९/क</u>

सरकार तर्फे **साक्षीदार क्रमांक ०२** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नांव :— सचिन ज्ञानोबा सानप

वय :— ४० वर्षे, व्यवसाय :— नौकरी मंडळ अधिकारी पिंपळनेर

राहणार :— भक्ती कंन्स्ट्रक्शन बीड

---

**<u>सरतपासणी {ॲड.एम.एम.दराडे सहा.सरकारी वकील}</u>**

०१. मी सन २०२० साली तलाठी सज्जा कुर्ला ता.बीड येथे नेमणुकीस होतो. दिनांक २३.१२.२०२० रोजी मी माझे कर्तव्यावर होतो. त्यादिवशी आम्ही गौण खनिज वाहतुक नियंत्रणासाठी गस्त घालत होतो. माझे सोबत तलाठी सज्जा कुक्कडगाव अजय बाबासाहेब मोराळे हे होते. आम्ही दोघे तहसीलदार यांचे आदेशाने गस्त घालत होतो. गस्त घालत असतांना आम्ही उमरी कडुन येतांना म्हाळस जवळा रस्त्यावर रात्री ०८.०० वा. च्या सुमारास एक हायवा बीड कडे येतांना दिसला. आम्ही त्या हायवाला थांबवले व त्याची तपासणी केली. त्यामध्ये ०५ ब्रास वाळु दिसुन आली. आम्ही वाहन चालकास त्याचे नाव विचारले. त्याने त्याचे नाव शेख अन्सार असे सांगितले. आम्ही त्यास वाहन मालकाचे नाव विचारले. त्याने मालकाचे नाव शमशेर खान सांगितले. सदर **हायवाचा क्र.एमएच २३/ एयु/४५९७** असा होता. आम्ही सदर चालकाने कोणाला फोन करु नये म्हणुन चालकाचा मोबाईल ताब्यात घेतला होता व सदरचा हायवा मुद्देमालासह त्याला तहसील कार्यालय, बीड येथे घेण्यास सांगितले. त्यानंतर सदर घटनास्थळावर दुसरे दोन लोक आले. त्यापैकी एक मालक होते व एक अनोळखी व्यक्ती होता. ते काळ्या रंगाचे स्कॉर्पीओ गाडीने आले. आम्ही त्यांना विना परवाना वाहतुक

करीत असल्याने हायवा जप्त केल्याचे सांगितले व तहसील कार्यालयात चला असे सांगितले. त्यांनी मला 'गाडी पकडण्याची तुमची हिम्मत कशी झाली' असे सांगितले. त्यांनी मला बाजुला ढकलले व बीडच्या दिशेला हायवा घेवुन गेले. त्यांनी अंदाजे तीस हजाराची शासनाची रॉयल्टी चुकवली. त्यानंतर मी पिंपळनेर पोलीस ठाणे येथे फिर्याद दिली. आता मला फिर्याद दाखविण्यात आली. ती तीच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. ती **फिर्याद निशाणी क्र.३०** वर आहे. **विहीत नमुन्यातील ए.आय.आर निशाणी क्र.३१** वर आहे. त्यानंतर मी पोलीसांना घटनास्थळ दाखवले. सदर जप्त केलेला मोबाईल मी पोलसांना दिला होता. मला आता दाखविण्यात आलेला दिनांक ०२.११.२०२० रोजीचा तहसीलदार यांचा आदेश आमच्या नियुक्तीबाबतचा आहे. सदरचा आदेश **निशाणी क्र.३२** वर आहे. तसेच महाराष्ट्र शासनाचे परिपत्रक दिनांक १६.०८.२०२० रोजीचे असुन ते गौण खनिजच्या कार्यवाही बाबतचे असुन ते **निशाणी क्र.३३** वर आहे. आमच्या कार्यालयात आमचे हजेरी पट नसते. आज रोजी आरोपी न्यायालयात हजर आहेत.

**उलटतपासणी आरोपी तर्फे विधीज्ञ एस.बी.शेख**

०२. हे म्हणणे खरे आहे की म्हाळस जवळा उमरी रस्त्यावर बरेचशे खेडेगाव आहे व त्या रस्त्यावर पिंपळनेर व नाथापुर अशी बाजारपेठ असलेली गावे देखील आहे. हे म्हणणे खरे आहे की नाथापुर व पिंपळनेर येथील लोकांना कोणतेही शासकीय कामासाठी बीड येथे यावे लागते. हे म्हणणे खरे आहे की सदरच्या रोडवर वाहनाची नियमीत रहदारी असते. हे म्हणणे खरे आहे की म्हाळस जवळा व उमरी रोडवर हॉटेल, दुकाने व टपरी असुन तेथे लोकांची वर्दळ असते. आम्ही आरोपीच्या नावाची खात्री करण्याकरीता त्याचे

ओळखपत्राची पाहणी केली नाही. तसेच मी वाहनाचे आर.सी.बुक पाहीले नाही. साक्षीदार सांगतो की त्यांनी दाखवले नाही. आमच्या ऑफीसची कार्यालयीन वेळ सकाळी १०.०० ते सायं. ०६.०० आहे. आम्हाला रात्रीच्या गस्तीसाठी तहसीलदार यांचे आदेश होते. हे म्हणणे खरे नाही की मला रात्रीच्या गस्तीसाठी तहसीलदारांचे आदेश नव्हते. हे म्हणणे खरे नाही की माझे सोबत अजय मोराळे होते हे मी खोटे सांगतो. हे म्हणणे खरे आहे की घटनास्थळाजवळ कोणतीही लोक वस्ती अथवा गाव नाही व तेथे सायंकाळ नंतर अंधार असतो. हे म्हणणे खरे नाही की अंधारामध्ये तेथे कोण लोक आले होते हे मला दिसले नाही. हे म्हणणे खरे नाही की तेथे दोन लोक स्कॉर्पीओ गाडीने आले, त्यातील एक जण गाडीचा मालक होता व एक अनोळखी माणुस होता, त्यांनी मला ढकलले व हायवा घेउन गेले, त्यामध्ये पाच ब्रास वाळु होती हे मी खोटे सांगतो. हे म्हणणे खरे नाही की, मी माझे कार्यालयात हजेरी पट नसते हे मी खोटे सांगतो. हे म्हणणे खरे नाही की मी सांगितल्याप्रमाणे कोणतीही घटना घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की मी माझे सरतपासात खोटे कथन केले आहे. हे म्हणणे खरे नाही की मी तहसीदाराच्या सांगण्यावरुन आरोपी विरुध्द खोटी फिर्याद दिली. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष दिली.

**उलट तपास पुर्ण.**

**फेर तपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

RENUKA MANIKRAO SATAV

Digitally signed by RENUKA MANIKRAO SATAV
Date: 2026.02.07 14:58:25 +0530

**( रेणूका एम. सातव )**

दिनांक : ०६/०२/२०२६

अतिरीक्त सत्र न्यायाधीश, बीड